# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

परिपत्रक क्र! 203

No.SRA/२०३
दिनांक- 19 APR 2022

**कार्यालयीन आदेश** -

**विषय:-** **विकास नियंत्रण नियमावली 33 (14) (डी) / 33 (11) अंतर्गत प्राप्त होणा-या कायमस्वरुपी संक्रमण सदनिका (PTC) हस्तांतरणाबाबत.**

विकास नियंत्रण नियमावली 33 (14) (डी) / 33 (11) अंतर्गत कायमस्वरुपी संक्रमण सदनिका निर्माण होतात. झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरणाकडील पी.टी.सी. सदनिका शिवशाही पुनर्वसन प्रकल्प लि. कडे हस्तांतरीत करणेबाबत ठराव क्रं. 14/16, दि. 12/08/2015 मंजूर करण्यांत आला. सदर बैठकीतील ठराव क्रं. 14/16 मध्ये पुढीलप्रमाणे नमूद केले आहे-

" झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरणाकडील विकास नियंत्रण नियमावली 1991 च्या विनिमय 33 (14) प्रमाणे उपलब्ध होणा-या कायम स्वरुपाच्या संक्रमण शिबीराच्या पीटीसी (PTC) सदनिका संपूर्णत: शासन स्वामित्व असलेल्या शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितकडे मालकी तत्वावर हस्तांतरीत कराव्यात. शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित कडून या पीटीसी (PTC) सदनिकांसाठी झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरणाला प्रति सदनिका रु. 20,000/- एवढी खरेदीची किंमत अदा करावी., असा ठराव संमत करण्यांत आला "

वरील ठरावास अनुसरुन विकास नियंत्रण नियमावली 33 (14) (डी) / 33 (11) अंतर्गत निर्माण होणा-या कायमस्वरुपी संक्रमण सदनिकाबाबत पुढीलप्रमाणे आदेशीत करण्यांत येत आहे -

१. झोपडपटटी पुनर्वसन योजनेतील पी. टी. सी. सदनिकांचा भोगवटाप्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या प्रति व संपूर्ण तपशील मिळकत विभाग, झो. पु. प्रा. यांना कार्यकारी अभियंता, झो. पु. प्रा. यांनी पृष्ठांकित करावा.

२. विकासकाने सदनिका हस्तांतरणासाठी तयार करुन सर्व कागदपत्रासह जसे की, पाणी व वीज जोडणी, उदवाहन परवाना, वीज देयेके इत्यादी बाबीसहित मिळकत विभाग, झो. पु. प्रा. यांना कळविण्यांत यावे.

प्रशासकिय इमारत, तिसरा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पुर्व) मुंबई -४०० ०५१
Fax: ९१-२२-२६५९०४५७; Tel. ०२२-२६५९०५९१/०४०५/१८७४/९११३; Email: info@sra.gov.in

३. मिळकत विभागाने पी. टी. सी. सदनिका शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांना हस्तांतरीत करण्यापुर्वी पुर्ण तपशील व नोंद ठेवावी.

४. मिळकत विभागाने शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांचेकडून हस्तांतरण करावयाचे सदनिकेसाठी रुपये २०,०००/- प्रती सदनिका वसूल करणेबाबत पाठपुरावा करुन वित्त नियंत्रक, झो.पु.प्रा. यांचेकडे जमा करुन घ्यावे.

५. तदनंतर विकासकामार्फत पी. टी. सी. सदनिकांचा ताबा शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांना हस्तांतरण करण्याची कार्यवाही करण्यांत यावी.

सदर आदेश तत्काळ अमंलात येतील.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरण**

**प्रति,**

१. सचिव, झो.पु.प्रा.
२. वित्त नियंत्रक, झो.पु.प्रा.
३. उपमुख्य अभियंता, झो.पु.प्रा.
४. कार्यकारी अभियंता-१, झो.पु.प्रा.
५. कार्यकारी अभियंता-२, झो.पु.प्रा.
६. कार्यकारी अभियंता-३, झो.पु.प्रा.
७. कार्यकारी अभियंता-४, झो.पु.प्रा.
८. कार्यकारी अभियंता-५, झो.पु.प्रा.
९. कार्यकारी अभियंता-६, झो.पु.प्रा.
१० कार्यकारी अभियंता, मुंबई महानगर प्रदेश, झो.पु.प्रा. ठाणे
११ मिळकत व्यवस्थापक, झो.पु.प्रा.

प्रशासकिय इमारत, तिसरा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पुर्व) मुंबई -४०० ०५१
Fas: ९१-२२-२६५९०४५७: Tel. ०२२-२६५९०५११/०४०५/१८७१/०११३: Email: info@sra.gov.in